नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16 / 11 / 2022 (बुधवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. भिवापुर :– दिनांक ०४/१२/२०२१ चे ०१.१६ वा. दरम्यान फिर्यादी नामे– पिडीत मुलगी, वय १६ वर्ष यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे अप. क्र. ३९४/२०२१ कलम ३७६(२) (जे) सहकलम ४, ६, ८, १२ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/०८/२०२१ चे ०२.०० वा. रोजी सदर गुन्हयातील पिडीता ही घटना वेळी व ठिकाणी आरोपी नामे– मिथुन नथुजी सावसाकडे, वय २२ वर्ष, रा. खरकाडा याचे कामानिमीत्त गेली असता आरोपीने पिडीतेसोबत जबरीने शारीरीक संबंध केले. पिडीतेने कोणालाही सांगितले नसुन पिडीता ही आरोपीमुळे ०४ महिन्याची गर्भवती झाली. अशा फिर्यादीच्या तोंडी रीपोर्टवरून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. शितल खोब्रागडे, पोलीस स्टेशन उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक १६/११/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. **पांडे सा.** यांनी वरील नमुद आरोपीला कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम कारावास तसेच ०५ हजार रू. दंड दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. परसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ/८३१ तुलाराम खडसे, पोस्टे भिवापुर यांनी मदत केली आहे.

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा दाखल

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०८ कि.मी अंतरावरील कन्हान खोपडी, ता. मौदा येथे दिनांक १५/११/२०२२ चे १३.००वा. दरम्यान फिर्यादी नामे– बालचंद शामराव शेळके, वय ५० वर्ष, रा. गहुहिवरा रोड, पाटील नगर कांद्री (कमलेश शर्मा याचे घराजवळ) हा आपल्या शेतात गेला असता आरोपी क्र. १) भाऊराव टागले, वय ६० वर्ष, आरोंपी क्र. २) शोभाबाई शेळके, वय ६५ वर्ष, आरोपी क्र ३) प्रियका शिगणजोडे, वय ३५ वर्ष हे तिथे आले व आरोपी क्र १) याने अश्लिल शिवीगाळ केली व हातातील कु–हाड घेवुन जिवे मारण्यास धावला असता फिर्यादी शेतातुन पळत असता आरोपी क्र २) व ३) यांनी फिर्यादीस अडकावुन आरोपी क्र.  २) याने चपलाने फिर्यादीस मारहाण केली आरोपी क्र. २) शोभाबाई शेळके व आरोपी क्र ३) प्रियका शिगणजोडे या दोघाने हात पकडले. आरोपी क्र १) भाऊराव टांगले याने त्याच्या हातातील कु–हाड दांडा याने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन गभीर जखमी केले. लाकडी दांडयाने पायावर कमरेच्या उजव्या हातावर मारले व आरोपी क्र ४) शालु टागले, वय ३५ वर्ष हिने शेताच्या धु–यावर उभी राहुन फिर्यादीला “जिवाने मारुन टाका व वाचला नाही पाहिजे” असे म्हणत होती. फिर्यादीच्या नातेवाईकाने फिर्यादीच्या पत्नीला कळविल्याने फिर्यादीला उपचाराकरिता प्राथमिक आरोग्य केद्र, कन्हान येथे आणले तेथील डॉक्टरानी प्रथम उपचार करुन फिर्यादीस पुढील उपचार कामी मेडीकल कॉलेज, नागपुर येथे रेफर केल्याने उपचाराकरिता तेथे नेले फिर्यादीचा मेडीकल कॉलेज, नागपुर येथे उपचार सुरु आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, २९४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**